# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९९४५१००१

**Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट ०७/२०२५ दि. ०६/०१/२०२५

**नवनिर्मीत मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयास प्रथमच पोलीस विभागीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मंजूरी मिळाल्यानंतर ४९ वी कोकण परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धा २०२४ मध्ये सहभागी होऊन "जनरल चॅम्पीयनशीप" मिळवल्याबद्दल**

४९ वी कोकण परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धेमध्ये १. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय २. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय ३. रायगड ४. ठाणे ग्रामिण ५. सिंधुदुर्ग ६. रत्नागिरी ७. पालघर या पोलीस घटकाकडील संघांनी समावेश घेतला होता. सदर स्पर्धेमध्ये ॲथलेटिक्स, वेटलिफ्टींग, पॉवर लिफ्टींग, कुस्ती, ज्युडो, तायक्वांडो, वु-शु, बॉक्सींग, हॉकी, फुटबॉल, हॅन्डबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, खो-खो, कबड्डी व जलतरण या खेळाचा समावेश होता. सदर स्पर्धेकरीता नवी मुंबई आयुक्तालयाचे १९१, मिरा भाईंदर पोलीस आयुक्तालयाचे १५४, ठाणे ग्रामीण पोलीस दलाचे १११, रायगड पोलीस दलाचे १५१, सिंधुदुर्ग पोलीस दलाचे १०१, रत्नागिरी पोलीस दलाचे ६५ व पालघर पोलीस दलाचे १४० असे एकुण ९१३ पोलीस खेळाडुंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

सदरची स्पर्धा हि **दि. २८.१२.२०२४ ते ०३.०१.२०२५** दरम्यान पालघर येथे संपन्न झाली. वैयक्तीक खेळ प्रकारामध्ये मिरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयाने घेतलेली चॅम्पीयनशीप खालीलप्रमाणे

<table>
<tr><td>अ.क्र.</td><td>क्रिडा प्रकार</td><td rowspan="10">या सर्व क्रिडा प्रकारामध्ये चॅम्पीयनशीप मिळवलेली आहे.</td></tr>
<tr><td>१.</td><td>कुस्ती</td></tr>
<tr><td>२.</td><td>ज्युडो</td></tr>
<tr><td>३.</td><td>बॉक्सींग</td></tr>
<tr><td>४.</td><td>वेटलिफ्टींग</td></tr>
<tr><td>५.</td><td>तायक्वांडो</td></tr>
<tr><td>६.</td><td>वु-शो</td></tr>
<tr><td>७.</td><td>पॉवरलिफ्टिंग</td></tr>
<tr><td>८.</td><td>ॲथलेटिक्स</td></tr>
<tr><td>९.</td><td>क्रॉसकंट्री</td></tr>
</table>

सांघीक **पुरुष चषक** विजेता संघामध्ये मिरा भाईंदर पोलीस आयुक्तालयाने केलेली कामगिरी

| अ.क्र. | क्रिडा प्रकार (पुरुष) | क्रमांक |
|---|---|---|
| १. | कबड्डी | प्रथम क्रमांक |
| २. | हॅन्डबॉल | प्रथम क्रमांक |
| ३. | खोखो | व्दितीय क्रमांक |
| ४. | व्हॉलीबॉल | व्दितीय क्रमांक |

| | | |
|---|---|---|
| ५. | फुटबॉल | तृतीय क्रमांक |

सांघीक **महिला चषक** संघामध्ये मिरा भाईंदर पोलीस आयुक्तालयाने केलेली कामगिरी

| अ.क्र. | क्रिडा प्रकार (महिला) | क्रमांक |
|---|---|---|
| १. | व्हॉलीबॉल | व्दितीय क्रमांक |
| २. | खोखो | तृतीय क्रमांक |

## सदर क्रिडा स्पर्धेमध्ये

१. **जनरल चॅम्पीयनशिप पुरुष-** मिरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयाने १९० गुण प्राप्त करुन विजेतेपद मिळवले.

२. **बेस्ट ॲथलिट पुरुष-** पोलीस अंमलदार २३४३६ शंभु साहेबराव सुपेकर मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय. यांना मिळालेले आहे.

**वरील प्रमाणे केलेल्या कामगिरीबद्दल मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मा.श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. सुहास बावचे, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), मा.श्री. सोहेल शेख,सहा.पो.आयुक्त (मुख्यालय), यांनी सदर क्रिडा स्पर्धेसाठी वरिष्ठांनी खालील खेळाडु व प्रशिक्षक यांचे मनपुर्वक अभिनंदन केलेले आहे.**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पाटील, अर्नाळा पोलीस ठाणे, पोलीस उपनिरीक्षक तुषार माळोदे (शिवछत्रपती क्रिडा पुरस्कार), पोलीस उपनिरीक्षक किशोर धायगुडे, पोलीस उपनिरीक्षक कुनाल कुरेवाड, पोलीस उपनिरीक्षक मेहबुब तडवी, पोलीस उपनिरीक्षक किरण कदम, पोलीस उपनिरीक्षक तुषार जगताप, राखीव पोलीस उपनिरीक्षक सतिश गु-हाळे, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र राणे, पोहवा.०६१९४ संदीप यादव,स्पोर्टस इनचार्ज , पोहवा. जमीर मुलाणी,पोहवा नामदेव इस्वलकर, पोहवा सुर्याजी लिंगाडे, पोहवा वसंत राणे, पोहवा जावेद मुल्ला, पोहवा सचिन म्हस्के, पोहवा प्रदिप टक्के.

**सदर केलेल्या कामगिरीची दखल घेवुन पुढील वर्षी होणाऱ्या क्रिडा स्पर्धेचे यजमानपद हे मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाला देण्यात आलेले आहे.**





------------00000--------------